पुणे महानगरपालिका जाहिरात क्र.१/१२९५ दि.०६-११-२०२३

आरोग्य कार्यालया अंतर्गत खालील अस्थायी पशु वैद्यकीय अधिकारी हे पद ०६ महिन्यांकरिता करार पद्धतीने,एकवट मानधनावर भरावयाचे आहे.

| अ क्र | हुद्दा | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पशु वैद्यकीय अधिकारी (व्हेटरनरी ऑफिसर) | रु.४५,०००/- | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी अथवा पदव्युत्तर पदवी. | पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी आणि अथवा संबंधित कामाचा ३ वर्षाच्या अनुभवास प्राधान्य. | ०२ | अजा -१<br>भजब -१ |

अटी - १. वरील अनु.क्र.१ मधील पदासाठी अजा व भजब वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. २.वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक. ३.सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे. ४.सर्व पदांच्या नेमणुका असेसमेंट पद्धतीने करण्यात येतील. ५.उमेदवारांनी अर्जासोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो,आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती व अनुभवाच्या मूळ सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ६.अर्ज करताना उमेदवारांच्या जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची छायांकित प्रत जोडणे आवश्यक.७.अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.(शासनमान्य) ८.विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज,वय शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक,जातीचा दाखला,अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.९.निवड झालेल्या उमेदवारांना विहित नमुन्यात करारनामा करून फक्त ६ महिन्यांकरिता नेमणूक दिली जाईल.१०.वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपीची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. ११.वरील पदासाठी नियुक्त होणाऱ्या सेवकांना महानगरपालिकेच्या कत्तलखाना व पशु वैद्यकीय विभागा अंतर्गत काम करावयाचे असून सदर कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा.खातेप्रमुख यांना राहील. १२.अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १३.उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १४.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास,गैरवर्तन करताना आढळल्यास,दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.१५.निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एक महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

वरील सर्व पदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी दि.१७/ ११/२०२३ रोजी सकाळी ११.०० ते २.०० या वेळेमध्ये आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित कॅ.वडके सभागृह,आरोग्य कार्यालय,तिसरा मजला,पुणे महानगरपालिका,मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे -०५.येथे सादर करावेत.वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत,याची नोंद घ्यावी.सदरची जाहिरात ही www.pmc.gov.in या संकेतस्थळावर Recruitment या सदरात उपलब्ध आहे.उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयामार्फत वरील ठिकाणीच देण्यात येईल.

(डॉ.भगवान पवार)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका